**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,**
**17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-1**
**Web-www.jdhepune.in** **E-mail:jdhepune@gmail.com**
फोन नं. 020-26127833, 26051632, फॅक्स नं. 020-26127833

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/2025/ई 2180058 दि. 18-09-2025

प्रति,

1. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
2. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
3. कुलसचिव, सर्व अकृर्षि अभिमत व खाजगी विद्यापीठे/संस्था, पुणे.
4. प्राचार्य / प्राचार्य,
   अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित
   कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य, व शारिरीक शिक्षणशास्त्र
   महाविद्यालये, **पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा.**

**विषय- विकसित भारत 2047 या केंद्र सरकारच्या उपक्रमांतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन-राष्ट्रीय सेवा योजना माध्यमातून दिनांक 17 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर, 2025 या कालावधीमध्ये विविध उपक्रम राबविण्याबाबत.**

संदर्भ:- मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडील परिपत्रक उशिसं/ 2025/परिपत्रक/मवि-1/1701, दि. 15-09-2025

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडील दि. 15-09-2025 रोजीच्या परिपत्रकाचे कृपया अवलोकन करावे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यातर्फे 17 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर, 2025या दरम्यान **"विकसित भारत संवाद online व्याख्यानमाला"** आयोजित करण्यात येत असुन, या व्याख्यानमालेत राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्यक्ती विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यातर्फे राज्यातील विद्यापीठे/महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक माध्यमातून सोबत जोडलेल्या परिपत्रकातील मुद्द्याप्रमाणे उपक्रम राबविण्यात यावेत. (सोबत संदर्भिय परिपत्रक संलग्न)

युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालय भारत सरकार यांच्या निर्देशानुसार याच कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना तर्फे संपूर्ण राज्यभरामध्ये **"स्वच्छता ही सेवा" अभियान 2025** हा उपक्रम विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत सार्वजनिक स्वच्छता, सफाई मित्र सुरक्षा शिबीर, Clean Green उत्सव, स्वच्छ सुजल गाव, स्वच्छ आरोग्यदायी स्ट्रीट फूड इत्यादी विशेष उपक्रम राबविण्यात यावेत. तसेच दिनांक

25 सप्टेंबर, 2025 रोजी राष्ट्रीय स्वच्छता अभियान अंतर्गत सर्व नागरिकांना हाताची साखळी करून संपूर्ण देशभरात आणि राज्यातही श्रमदान अंतर्गत **"एक दिन, एक घंटा, एक साथ"** हे एक तासाचे अभियान राबविण्यात यावे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Apprenticeship Embedded Degrec Programme (AEDP) च्या मार्गदर्शक तत्वानसार पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी AEDP संदर्भांत सर्व विद्यापीठांमध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे असे नमुद केले आहे.

त्याअनुषंगाने उपरोक्त उपक्रम राबविण्याबाबत सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांनी आपल्यास्तरावर उचित कार्यवाही करावी.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 18-09-2025
17:52:33

**(डॉ.अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

**सोबत :** संदर्भिय परिपत्रक.
**प्रत :** मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-16.

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Website : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९


उशिसं/ २०२५/परिपत्रक/ मवि-१/१७०१ दिनांक: १५.०९.२०२५

## परिपत्रक

**विषय- विकसित भारत २०४७ या केंद्र सरकारच्या उपक्रमांतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन - राष्ट्रीय सेवा योजना माध्यमातून दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये विविध उपक्रम राबविण्याबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, विकसित भारत २०४७ हा भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापूर्वी विकसित राष्ट्र बनण्याच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या उद्देशाने एक उपक्रम आहे. २०४७ मध्ये भारत स्वातंत्र्याच्या १०० व्या वर्षाच्या जवळ येत असताना, हा उपक्रम व्यापक आणि शाश्वत विकास साध्य करण्यासाठी आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि प्रशासनिक क्षेत्रात प्रयत्नांना एकत्रित करण्याचा प्रयत्न करतो. ही संकल्पना भारताला एक आघाडीची जागतिक शक्ती म्हणून जगासमोर आणण्याची क्षमता दर्शविते. तरुणांमध्ये हा विचार पुढे नेण्यासाठी **"विकसित भारत राजदूत - युवा कनेक्ट"** कार्यक्रम भारत सरकार तर्फे आयोजित केला जाणार असून, याचा उद्देश भारताच्या विकासात्मक परिवर्तनात तरुणांचा सहभाग आणि नेतृत्व वाढवणे हा आहे.या अनुषंगाने राज्यामध्ये या संदर्भात विविध उपक्रम / कार्यक्रम आयोजित करून मा. पंतप्रधान यांच्या विकसित भारताच्या दृष्टिकोनाला जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहोचवणे हा आहे.

या निमित्ताने उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यातर्फे दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या दरम्यान **"विकसित भारत संवाद - online व्याख्यानमाला"** आयोजित करण्यात येत असून या व्याख्यानमालेत राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्यक्ती विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

तसेच राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यातर्फे राज्यातील विद्यापीठे/ महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक माध्यमातून खालील प्रमाणे उपक्रम राबविण्यात यावेत.

- रक्तदान अमृतमहोत्सव अंतर्गत सर्व विद्यापीठ व महाविद्यालय येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करणे.
- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छयोत्सव हा उपक्रम राबविणे.
- सफाई मित्र सुरक्षा शिबिर अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करणे.
- Clean Green उत्सव अंतर्गत Zero Waste Management & Used Eco-Friendly Utensils Programme.

- विकसित भारत @ २०४७ मध्ये युवकांचा सहभाग याबाबत व्याख्यान आयोजित करणे.
- NSS स्थापना दिवस २४ सप्टेंबर, २०२५ निमित्त मा. पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखाली देशाची प्रगती व पुढील वाटचाल या संदर्भात युवकांशी संवाद कार्यक्रम आयोजित करणे.
- **"एक दिन, एक घंटा, एक साथ"** राष्ट्र स्वच्छता अभियान आयोजित करणे.
- जागतिक पर्यावरण आरोग्य दिवसानिमित्त जनजागृती करणे.
- विश्व पर्यटन दिवस निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांबाबत व त्यांनी निर्माण केलेल्या हिंदवी स्वराज्याबाबत व्याख्यान आयोजित करणे.
- शहीद भगतसिंह यांच्या जयंतीनिमित्त युवकांमध्ये देशभक्ती, साहस व त्यांचे आदर्शाचे स्मरण करण्यासाठी व्याख्यान आयोजित करणे.
- जागतिक हृदय दिवस निमित्त पोषण आहार / अनेमिया / हृदय रोग / मधुमेह / उच्च रक्तदाब या बद्दल कार्यशाळा / निबंध / पथनाट्य या सारखे उपक्रम आयोजित करणे.
- सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम आयोजित करणे.

युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालय भारत सरकार यांच्या निर्देशानुसार याच कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना तर्फे संपूर्ण राज्यभरामध्ये **"स्वच्छता ही सेवा" अभियान २०२५** हा उपक्रम विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक यांचामार्फत राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत सार्वजनिक स्वच्छता, सफाई मित्र सुरक्षा शिबीर, Clean Green उत्सव, स्वच्छ सुजल गाव, स्वच्छ आरोग्यदायी स्ट्रीट फूड इत्यादी विशेष उपक्रम राबविण्यात यावेत. तसेच दिनांक २५ सप्टेंबर, २०२५ रोजी राष्ट्रीय स्वच्छता अभियान अंतर्गत सर्व नागरिकांना हाताची साखळी करून संपूर्ण देशभरात आणि राज्यातही श्रमदान अंतर्गत **"एक दिन, एक घंटा, एक साथ"** हे एक तासाचे अभियान राबविण्यात यावे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP) च्या मार्गदर्शक तत्वानुसार पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी AEDP संदर्भात सर्व विद्यापीठांमध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे.

तरी उपरोक्त उपक्रम राबविण्याबाबत अधिनस्त महाविद्यालयांना आपल्यास्तरावरून सुचित करण्यात यावे.

( डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. सर्व विभागीय संचालक (उच्च शिक्षण)

२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे